भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
www.rbi.org.in

आरबीआय/2016-2017/123
डीसीएम(पीएलजी)क्र.1251/10.27.00/2016-17 नोव्हेंबर 10, 2016

अध्यक्ष/व्यवस्थापकीय संचालक/मुख्य कार्यकारी
अधिकारी/सार्वजनिक क्षेत्रातील बँका/खाजगी
क्षेत्रातील बँका/विदेशी बँका/प्रादेशिक ग्रामीण बँका/नागरी
सहकारी बँका/राज्य सहकारी बँका,

महोदय

**विद्यमान रु.500 व रु.1000 च्या बँक नोटांचे वैध चलन लक्षण काढून घेणे/बाद करणे - रोख रक्कम काढण्यासाठी मर्यादा**

कृपया आमचे परिपत्रक डीसीएम (पीएलजी) क्र..1226/10.27.00/2016-17 दिनांक नोव्हेंबर 8, 2016 चा संदर्भ घ्यावा.

(2) ह्या परिपत्रकाच्या परिच्छेद 3 क(4) अनुसार, ह्या अधिसूचनेच्या तारखेपासून ते 24 नोव्हेंबर 2016 रोजी कामकाज बंद होईपर्यंत एखाद्या खात्यामधील काऊंटरवर काढावयाची रोख रक्कम मर्यादा प्रति दिवस रु.10000/- व प्रति सप्ताह, सर्वसमावेशक रु.20,000/- असेल. त्यानंतर ह्या मर्यादांचे पुनरावलोकन केले जाईल. येथे स्पष्ट करण्यात येते की, बँक खात्यामधून पुढील प्रकारे रोख रक्कम काढण्यासाठी ह्या मर्यादा लागु नाहीत.

(1) एका बँकेतून दुस-या बँकेत
(2) पोस्ट ऑफिस
(3) आंतरराष्ट्रीय विमानतळांवर काम करणारे पैसा-विनिमय करणारे आणि
(4) व्हाईट लेबल एटीएमचे ऑपरेटर्स.

(3) करन्सी चेस्ट ठेवणा-या शाखांना सांगण्यात येते की, त्यांनी त्यांच्या जवळपास असलेल्या (जोडलेल्या किंवा अन्यथा) शाखांच्या रोख रकमेबाबतच्या विनंत्या समावून घ्याव्यात.

(4) सर्व प्रकारच्या ठेवी/कर्ज खात्यात विहित बँक नोटा जमा करण्यास, सीटीआर/एसटीआर अहवाल पाठविण्याच्या अटीवर परवानगी आहे.

आपली विश्वासु

(पी.विजया कुमार)
मुख्य महाव्यवस्थापक

मुद्रा प्रबंध विभाग, केंद्रीय कार्यालय, 4था मजला, अमर बिल्डिंग, सर पी.एम.रोड, पो.बॉ.क्र.1379, मुंबई 400 001(भारत)
टेलिफोन + 91-22-2266 1644, 2260 4000; फॅक्स: + 91-22-2266 2442 ई-मेल : cgmincdcm@rbi.org.in